# निशाणी कमांक ६ वरील आदेश

(दि. १३.११.२०१८ रोजी घोषीत)

प्रस्तुत अर्ज पिडीत महिलेने सामनेवाला याचेविरुध्द कौटुंबिक हिसांचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम २३ अन्वये अंतरिम अनुतोष मिळणेसाठी सादर केलेला आहे.

२. **अर्जदाराची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे** :—

अर्जदार व सामनेवाला यांचा विवाह दि.२०.०५.२००२ रोजी हिंदू रितीरिवाजाप्रमाणे झालेला असून त्यांना सामनेवालापासून मुलगा सुरज व मुलगी भार्गवी हे झालेले आहेत. अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, सामनेवाला ऑगस्ट २०१७ पासून अर्जदार यांच्यापासून वेगळा बाहेर राहत आहे. तेव्हापासून त्याने अर्जदार यांचेकडे दुर्लक्ष केलेले आहे. सामनेवाला याने अर्जदार व त्यांची मुले यांचे पालनपोषणाची व उदरनिर्वाहाची कसलीही तरतूद केलेली नाही. अर्जदार व सामनेवाला यांच्या लग्नानंतर अडीच महिन्यांनी अर्जदार या गरोदर राहिल्या. सामनेवाला व त्यांचे आई —वडिल यांनी सामनेवाला याचे बहिणीचे लग्न होईपर्यंत मूल नको असा हट्ट धरला व जबरदस्तीने डॉ. शहा यांचेकडे नेऊन अर्जदार हिचा गर्भपात केला. त्यामुळे अर्जदार हिस मानसिक त्रास सहन करावा लागला. सामनेवाला हे अर्जदार हिस माहेरी देखील पाठवित नव्हते.

३. सामनेवाला याचे बाहेरख्याली वागणे वाढले व त्यामुळे त्यांनी घरी न येणे, बाहेरगावी गेल्यास घरात न सांगणे, घरातील जेवण न खाणे, डयुटीवरुन वेळेवर परत न येणे इत्यादी प्रकारे सामनेवाला अर्जदार हिस त्रास देउ लागला. सामनेवाला याने अर्जदाराचे १० व ३ तोळयाचे असे दोन गंठण, सव्वातीन तोळयाचा हार, कानातले, ८ अंगठया, मुलांची वाघनखे, चैन इ. असलेले स्त्री धन

जबरदस्तीने नेउन विकले. त्यामुळे अर्जदार हिस खूप त्रास झाला. सामनेवालाविरुध्द वृशाली उर्फ कविता रुपेश मेस्त्री हिने खोपोली पोलिस स्टेशनला दि.०२.०४.२०१४ रोजी छेडछाड केल्याबाबतची तक्रार दिली होती. सामनेवाला याने अर्जदार हिस वारंवार मानसिक तसेच शारिरीक त्रास दिल्यामुळे अर्जदार हिने सामनेवाला याचे विरुध्द कर्जत पोलीस ठाण्यात दिनांक ३०/१२/२०१७ रोजी तर खोपोली पोलीस ठाण्यात दिनांक १२/०२/२०१८ रोजी तक्रार अर्ज दिलेले आहेत.

४. सामनेवाला हा संशयी वृत्तीचा असून त्याच्या वागण्यामुळे अर्जदार व तिचे मुलांना नाहक त्रास होत आहे. सामनेवाला याने दिनांक २७.०३.२०१८ रोजी नोटीस पाठवून घटस्फोट घेण्याचीच भाषा वापरली. सामनेवाला याने अर्जदार तसेच त्यांचे मुलांची पोलनपोषनाची तसेच उदरनिर्वाहाची तरतूद न केल्याने अर्जदाराला सदरचा अर्ज न्यायालयात दाखल करणे भाग पडले आहे. सामनेवाला हा पोलिस नाईक पदावर काम करीत असून सध्या नियंत्रण कक्ष, पोलीस अधिक्षक कार्यालय, अलिबाग येथे नोकरीस असून त्यास दरमहा रक्कम रुपये ४५,०००/— इतका पगार मिळतो. तसेच त्याची मौजे तरणखोप येथे सात एकर शेतजमीन असून तेथे आंब्याची बाग देखील आहे.

५. सामनेवाला याने अर्जदार हिचा कौटुंबिक छळ केल्याने अर्जदाराने सदरचा अर्ज हा तुर्तातूर्त पोटगी दरमहा रक्कम रुपये २०,०००/—, निवा—याचा खर्च दरमहा रक्कम रुपये ५,०००/— व मुलांच्या शैक्षणिक खर्च व फी व ट्युशन फी, इ. करीता रक्कम रुपये २,५०,०००/— मिळण्याकरीता दाखल केला आहे.

६. सामनेवाला याने हजर होवून नि.क्र. १३ कडे या अर्जाच्या सुनावणीकामी आपले म्हणणे दाखल केले. सामनेवाला याचे म्हणणे की, अर्जदार ही पहिल्यापासून लफडेखोर असल्याने तिचा विवाह होत नव्हता. सदरची गोष्ट

सामनेवाल्यास माहिती नव्हती. अर्जदाराचे आई वडीलांनी पुढाकार घेऊन अर्जदाराचा सामनेवाल्याशी विवाह केला. सामनेवाला डयूटीवर गेल्यावर अर्जदार मुलांना शाळेत सोडायला जात असे. त्यावेळी ती तिच्या मित्रांसोबत मजा करु लागली. अर्जदार कुठलीही तमा व लाज लज्जा न बाळगता राज–रोसपणे रुपेश मेस्त्री याचे सोबत व्यभिचार करण्यासाठी बाहेर फिरायला गेली होती.

७. अर्जदाराच्या माहेरच्या लोकांनासुध्दा अर्जदाराचे अनैतिक वागणे व लफडी यांची माहिती होती तरीही त्यांनी सामनेवाल्याच्या गळ्यात अर्जदारासारखी पत्नी टाकून फसवणूक केली व त्याचे संसाराची राख–रांगोळी केली. अर्जदार हिस निरनिराळी सिमकार्ड्स वापरुन निरनिराळ्या मित्रांसोबत चॅटींग करण्याचा व प्रेमाच्या गोष्टी करण्याचा व सामनेवाल्याला शिव्या देण्याचा छंद लागलेला आहे. अर्जदाराकडे एकूण चार ते पाच सिमकार्ड्स आहेत.

८. लग्नानंतर अर्जदार व सामनेवाला पोलीस कॉर्टरमध्ये रहात होते परंतू केवळ अर्जदाराचे हट्टापाई सामनेवाल्यास भाड्याने ब्लॉक घ्यावा लागला आहे. सामनेवाला सध्या कर्जत येथे पोलीस स्टेशनच्या गाडीमध्ये रहात आहे व तसेच बाहेर खाणावळी मध्ये जेवतो. अर्जदार सामनेवाल्यावर खोटे नाटे अनेक आरोप करते तसेच सामनेवाल्याची बदनामी करते. अर्जदाराने मुलांसोबत कर्जत येथे येवून सामनेवाल्याबरोबर पोलीस स्टेशनचे चाळीत रहावे. अर्जदार सामनेवाल्यास गेल्या ६ महिन्यापासून सामनेवाल्यास घरी येवू देत नाही. मुलांना पितृ सुखापासून वंचित ठेवले आहे. तसेच सामनेवाल्यासही मुलांचे प्रेमापासून वंचित ठेवले आहे.

९. अर्जदाराचे एकंदरीत अविचाराचे वागण्याचा व वर्तनाचा समर्थन करण्याचा अर्जदाराचे व तिचे माहेरच्या मंडळींचा स्वभाव पाहून सामनेवाल्याने त्याचे दोन मुलांसह अर्जदारापासून विभक्त राण्याचा निर्णय अतिशय विचारपूर्वक घेतलेला आहे. सामेनवाला यापुढे अर्जदारासह एक्त्रित राहिल्यास अर्जदार सामेनवाल्याचे

जिवाचा घात करेल व स्वत: अविचाराने वागण्यासाठी मोकळी होईल अशी सामेनवाल्याची खात्री झालेली आहे. त्यामुळे सामनेवाल्याने अर्जदारास घटस्फोट देण्याचा निर्णयही अतिशय विचारपुर्वक घेतलेला आहे. अर्जदाराने सामनेवाल्यापासून घटस्फोट घेवून तिचे मनमर्जीप्रमाणे हवे तसे रहावे. वरील सर्व कारणांचा विचार होऊन अर्जदाराचा अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा.

१०. उभयतांच्या कथनांचा व कौटुंबिक हिसांचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे तरतुदींचा विचार करता माझेपुढे खालील वादप्रश्न उपस्थित होत असून त्यावरील निष्कर्ष त्यापुढे नोंदविण्यात येत आहेत—

| अ.क. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | अर्जदार दरमहा रुपये २०,०००/— इतकी अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे का ? | अंशत: होय दरमहा रक्कम रुपये ३,०००/— मिळण्यास पात्र |
| २) | अर्जदार हिची निवा—याची कायमस्वरुपी व्यवस्था होईपर्यंत सामनेवालाकडून घरभाड्यापोटी दरमहा रक्कम रुपये ५,०००/— मिळण्यास पात्र आहे का? | नाही |
| ३) | अर्जदार ही सामनेवाला कडून मुलांच्या शैक्षणिक खर्च व फी करीता रक्कम रुपये २,५०,०००/— मिळण्यास पात्र आहे का ? | नाही |
| ४) | आदेश ? | अर्ज अंशत: मंजूर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

**वादप्रश्न क्रमांक १ करिता :—**

११. सामनेवालाने अर्जदाराचा कौटुंबिक हिंसाचार केलेला असून त्या स्वत:ची उपजिवीका करण्यास असमर्थ असल्याने अर्ज मंजूर करण्याचा युक्तीवाद तिचे वकीलांनी केला. सामनेवाला यांचे वकीलांनी युक्तीवाद केला की, सामनेवाला

हा आजही अर्जदार व त्यांचे मुलांना सांभाळण्यास तयार आहे, त्यामुळे तो अर्जदार हिचे अर्जातील मागण्या पुर्ण करण्यास बांधिल नाही. कौटूंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण या कायद्यातील कलम २३ नुसार अंतरिम आदेशाकरीता केलेल्या अर्जाचा निकाल देतांना प्रकरणात खोलवर जाणे आवश्यक नसते. केवळ प्रथमदर्शनी तथ्ये दिसून येणे आवश्यक असते. पिडीत स्त्रीला तिने अर्जात केलेल्या कथनांना तसेच सामनेवालाने त्याचे उत्तरात केलेल्या कथनांना दुजोरा देण्यासाठी पुरावा दाखल करणे आवश्यक नसते.

१२. प्रस्तूत प्रकरणात सामनेवाला याने अर्जदार हिचेशी झालेला विवाह तसेच त्यातून त्यांना एक मुलगा व एक मुलगी झाल्याचे मान्य केले आहे. तसेच अर्जदार ही तिचे मुलांस खोपोली येथे तर सामनेवाला हा कर्जत येथे राहत असल्याचे देखील अभिलेखावर आले आहे. त्यामुळे केवळ अर्जदार ही स्वत:चा उदरनिर्वाह करण्यास समर्थ आहे किंवा नाही तसेच सामनेवाला याचेकडे अर्जदाराचे पालन पोषण करण्यासाठी उत्पन्नाचे पुरेसे साधन आहे किंवा नाही हेच पाहणे गरजेचे आहे. कोणत्याही स्त्रीचे लग्न झाल्यानंतर तिच्या निर्वाह भत्त्याची जबाबदारी तिच्या पतीवर असते. लग्नानंतर लगेचच पत्नीला निर्वाह भत्त्याचा अधिकार प्राप्त होतो. पत्नीचे पालनपोषण करणे, ही पतीची नैतीक जबाबदारी असते.

१३. अर्जदार स्वत:चा उदर निर्वाह करण्यासाठी असक्षम असल्याचे दिसून येते. म्हणून अर्जदार ही सामनेवाला याचेकडून पोटगीची रक्कम मिळण्यास पात्र असल्याचे निष्पन्न होते. सामनेवाला हा पोलीस खात्यात नोकरीस असून त्यास दरमहा रक्कम रुपये ४५,०००/— इतका पगार असल्याचे अर्जदाराचे म्हणणे असले तरी सामनेवाला यानेच त्याचे पगाराची स्लीप नि.क्र. २७ कडील यादी सोबत सादर केली असून त्यास शासकिय वजावटी कपात करुन २५,२५९/— इतका पगार जुलै २०१८ मध्ये असल्याने दिसून येते. त्यामुळे अर्जदाराची रक्कम रुपये २०,०००/— इतकी पोटगी मिळण्याची मागणी अवास्तव वाटत आहे.

अर्जदाराने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ प्रमाणे देखील याच न्यायालयात पोटगी मिळण्याकरीता अर्ज दाखल केला असून त्यात देखील अर्जदार हिस दरमहा अंतरिम पोटगी रक्कम रुपये २०००/— मंजूर करण्यात आली आहे, त्याचा या अर्जातील पोटगीची रक्कम ठरवितांना विचार होणे गरजेचे आहे. जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती पाहता अर्जदाराला अंतरिम निर्वाह भत्यापोटी दरमहा रक्कम रुपये ३,०००/— देणे न्यायोचित होईल. त्यामुळे वादप्रश्न १ चे उत्तर मी त्याप्रमाणे नोंदवित आहे.

**<u>वादप्रश्न कमांक २ व ३ करिता</u> :—**

१४. अर्जदार हिची निवा—याची कायमस्वरुपी व्यवस्था होईपर्यंत सामनेवालाकडून घरभाड्यापोटी दरमहा रक्कम रुपये ५,०००/— मिळण्यासाठी अर्जदार हिने मागणी केलेली आहे. अर्जदार हिची कायमस्वरुपी व्यवस्था होईपर्यंत घरभाड्यापोटीची रक्कमची मागणी ही मोघम स्वरुपाची असून अर्जदारने कुठे भाड्याने घर घेतले आहे ? ती किती रुपये घरभाडे भरत आहे ? या बाबतची कागदपत्रे अभिलेखावर दाखल केले नसल्याने सदरची मागणी मान्य करता येणार नाही.

१५. तसेच मुलांच्या शैक्षणिक खर्च व फी करीता रक्कम रुपये २,५०,०००/— ची मागणी अर्जदार हिने केली असून कौटूंबिक हिंसाचार प्रतिबंध कायद्यात अशी कोणतीही तरतूद नसल्याने सदरची मागणी मान्य करता येणार नाही. त्यामुळे वादप्रश्न २ व ३ चे उत्तर मी नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>वादप्रश्न कमांक ४ करिता</u> :—**

१६. कौटुंबिक हिंसाचाराने पिडीत असलेल्या महिलांच्या राज्यघटनेने दिलेल्या हक्कांचे परिणामकारक संरक्षण करण्याचा, कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ या कायदयाचा प्रमुख उद्देश आहे. त्यामुळे

सदर कायदयाचा उद्देश जोपासण्याच्या दृष्टीने आणि वादप्रश्न १ ते ३ च्या निष्कर्षांन्वये अर्जदारांचा अर्ज अंशतः मंजूर होण्यास पात्र ठरतो. सबब वादप्रश्न क्रमांक ४ चा निष्कर्ष नोंदविण्यासाठी खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| **१)** | अर्जदाराचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे. |
| **२)** | सामनेवाला याने अर्जदार हिस नि.क्र. ६ चा अर्ज दाखल केल्याच्या दिनांकापासून दरमहा रक्कम रुपये ३,०००/— (रुपये तीन हजार मात्र) अंतरिम पोटगी म्हणून दयावेत. |
| **३)** | अर्जदार व सामनेवाला यास निकालाची प्रत मोफत देणेत यावी. |

**ठिकाण : खालापूर**
**दिनांक : १३/११/२०१८**

**(विशाल श्रावण धोंडगे)**
**न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग, खालापूर**